विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व त्याबाबत झालेल्या कामकाजास व्यापक प्रसिध्दी करण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरीता नवीन लेखाशिर्ष निर्माण करणे.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ०१२५/ प्र.क्र. २९/२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११ जून २०२५

प्रस्तावना :-

सहकार विभागामार्फत लोकहितास्तव तसेच शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती राज्यातील सर्व शेतकरी/लाभार्थी यांचेपर्यंत पोहचुन त्यांना सदर योजनांचा लाभ मिळण्याकरीता योजनांचा प्रचार व प्रसिध्दी विविध माध्यमातुन करणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना व त्याबाबत झालेल्या कामकाजास व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरीता नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना व त्याबाबत झालेल्या कामकाजास व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरीता नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

मागणी क्रमांक व्ही - ०२ २४२५ - सहकार ००, १०५, माहिती व प्रसिध्दी (०१)- माहिती व प्रसिध्दी (०१) (०१) सहकार विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची जाहिरात व प्रसिध्दी (कार्यक्रम) (२४२५ २५९८) २६- जाहिरात व प्रसिध्दी	Demand No. V-02 2425 – Co-operation 00, 105 – information and publicity (01) - information and publicity (01) (01) Advertising and Publicity of Schemes of Co-operation Department (Schem) (2425 2598) 26 - Advertising and Publicity

२. या बाबीसाठी येणाऱ्या खर्चासाठी उप सचिव (अर्थसंकल्प), (V००११), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच कक्ष अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९८/२०२५/व्यय-२ दिनांक ०६.०२.२०२५ अन्वये व महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई अनौपचारीक संदर्भ क्र. १५/२०२५-२६/Tr No, दिनांक ०८.०५.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२५०६१११८२७४६८७०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH
ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=ca78467bcc4594e1e11741a7962a7a83feafb176442575037160fc343c4ae5ab, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2025.06.11 18:28:40 +05'30'

(संतोष पाटील)
अपर निबंधक तथा सह सचिव,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई.
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) नियोजन विभाग का. १४३१, मंत्रालय, मुंबई.
५) वित्त विभाग, व्यय-२/ अर्थ-१३, मंत्रालय, मुंबई.
६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
७) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
९) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/ व्यय-२), / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अवर सचिव (कार्यासन १७-स), सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती (कार्यासन २-स).